# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## मा.शहर सुधारणा समिती

## कार्यपत्रिका क्रमांक १

## सभावृत्तांत

दिनांक - ०७/०६/२०१३ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची विशेष पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दिनांक ०७/०६/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.गणेश पाटील, अपर जिल्हाधिकारी, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सुपे आशा रविंद्र
२) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा.सौ.साळुंखे सविता सुरेश
४) मा.तानाजी विठ्ठल खाडे
५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

याशिवाय मा.गावडे – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

(मा.शहर सुधारणा समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाव्दारे नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आली होती.)

मा.अपर जिल्हाधिकारी – (पिठासीन अधिकारी) सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केली आहे.

मा.नगरसचिव- विषय क्रमांक १ – मा.शहर सुधारणा समितीच्या सभापतीची नेमणूक करणे. मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदासाठी एक नामनिर्देशन पत्र दाखल झालेले आहे. त्यामधील

उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | सुपे आशा रविंद्र | भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू | सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर |

(मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केले. मा.पिठासीन अधिकारी यांनी त्यांची छाननी केली.)

मा.अपर जिल्हाधिकारी – (पिठासीन अधिकारी)

मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. सभापती शहर सुधारणा समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नांव पुढील प्रमाणे आहे.

१) सुपे आशा रविंद्र

कोणत्याही उमेदवारास १५ मिनीटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकारी यांजकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल अशी तरतूद असल्याने त्याप्रमाणे १५ मिनीटांचा अवधी देणेत येत आहे.

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला स.१२.०५ ते स.१२.२० हा १५ मिनीटांचा अवधी संपला.)

मा.अपर जिल्हाधिकारी – (पिठासीन अधिकारी)

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनीटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा.शहर सुधारणा समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.सुपे आशा रविंद्र हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक - १
दिनांक - ०७/०६/२०१३ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समिती सभापती पदासाठी एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले असून वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा.शहर सुधारणा समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.सुपे आशा रविंद्र हया एकच रितसर नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा.सुपे आशा रविंद्र यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
(गणेश पाटील)
अपर जिल्हाधिकारी,पुणे
पिठासीन अधिकारी
शहर सुधारणा समिती (विशेष सभा)

-------------

(नवनिर्वाचित सभापती मा.सुपे आशा रविंद्र यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

मा.नगरसचिव - विषय क्रमांक २ - मा.शहर सुधारणा समिती उपसभापतींची नेमणूक करणे. मा.शहर सुधारणा समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक – २ विषय क्रमांक - २
दिनांक - ०७/०६/२०१३
सूचक - मा.सविता साळुंखे अनुमोदक - मा.तानाजी खाडे

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या मा.शहर सुधारणा समितीच्या उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.शहर सुधारणा समितीच्या उपसभापतीची नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक – ३ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०७/०६/२०१३

सूचक - मा.उषा वाघेरे अनुमोदक - मा.आशा सुर्यवंशी

मा.शहर सुधारणा समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या बुधवारी दुपारी ३.०० वाजता विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी/सुट्टयानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(सुपे आशा रविंद्र)
सभापती
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ५२५ /२०१३
दिनांक - ०७/०६/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.